**क्रमांक १४७७(२)/२०१७/१४-अ** **दिनांक ७ सप्टेंबर, २०१९**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१७ (जाहिरात क्रमांक ५५/२०१७)
## सुधारित अंतिम निकालाची घोषणा

समांतर आरक्षणाच्या मुद्दयांसंदर्भात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ४१५९/२०१८, रिट याचिका क्रमांक ६५७८/२०१८, रिट याचिका क्रमांक १०८३७/२०१८ व रिट याचिका क्रमांक १०५७८/२०१८ प्रकरणी एकत्रित अंतिम न्यायनिर्णय मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी दिला आहे. सदर न्यायनिर्णय व त्याअनुषंगाने शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले अभिप्राय विचारात घेऊन शासनाच्या समांतर आरक्षणासंदर्भातील शासन परिपत्रक दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ व त्यासंदर्भात दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शुध्दिपत्रकातील तरतूदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १६, १७ व १८ सप्टेंबर, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१७ च्या एकूण ३७७ पदांचा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधिन राहून दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये जळगाव जिल्हयातील श्री. राजपूत रोहितकुमार राजेंद्रसिंग (बैठक क्रमांक MB००१०५९) हे राज्यातून प्रथम आले आहेत व सोलापूर जिल्हयातील श्री. नष्टे अजयकुमार कल्याण (बैठक क्रमांक PN००२४२९) हे मागास वर्गवारीतून राज्यातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून पुणे जिल्हयातील श्रीमती न-हे रोहिणी दत्तात्रय (बैठक क्रमांक PN००६१८५) हया राज्यातून प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व पदनिहाय प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ दिनांक २ एप्रिल, २०१७ रोजी मुंबईसह अन्य ३७ जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता १९८५९९ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षमधून राज्य सेवा (मुख्य) परीक्षेकरिता ४८३९ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि.१६, १७ व १८ सप्टेंबर, २०१७ रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे घेण्यात आली होती. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी ११९४ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले.

५. अर्जात प्राविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरून प्रसिध्द

करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेल्या क्रीडा विषयक अर्हता धारण करत असल्याबाबतचा, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचा म्हणजेच दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

६. शिफारसपात्र ठरलेल्या दिव्यांग उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२१७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

दिनांक: ०७ सप्टेंबर, २०१९
ठिकाण : मुंबई

उप सचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग